ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज (TM)
WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 25 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## काश्मिरी पंडितांना पुन्हा टार्गेट किलिंगची धमकी, घरच्या पत्त्यांसह हिटलिस्ट जाहीर





पान 3 वरुन...

जिल्हा रुग्णालय होणार सुपर स्पेशालिटी हब!

### 3 नवजात बालकांच्या मृत्यूने महाराष्ट्र हादरला; अमरावतीतील घटना

# जिल्हा स्त्री रुग्णालयात 'व्हेंटिलेटर स्फोट...!'



**महाईन्यूज । अमरावती**

**अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयात सोमवारी पहाटे नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) लागलेल्या भीषण आगीत तीन नवजात बालकांचा धुरामुळे गुदमरून दुर्दैवी मृत्यू झाला. तिसऱ्या मजल्यावरील या विभागात आग लागली. घटनेच्या वेळी कक्षात १२ नवजात बालकांवर उपचार सुरू होते. आगीची माहिती मिळताच डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी तातडीने बचावकार्य सुरू करून बालकांना सुरक्षित ठिकाणी हलविले.**

गृहमंत्री अमित शाह यांनी ‘एक्स’वर माहिती देताना सांगितले की, मोदी सरकारने स्वातंत्र्यदिनापूर्वी आयएसआयचे कथित पाठबळ असलेल्या ‘शाहजाद भट्टी नेटवर्क’चे मनसुबे उधळून लावले आहेत. दहशतवादाविरोधात भारताच्या ‘झिरो टॉलरन्स’ धोरणाचे हे उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

गृह मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, सीमेपलीकडून चालणाऱ्या दहशतवादाविरोधात १४ राज्यांमध्ये कारवाई करण्यात आली. या कारवाईत २५३ संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून ८० हून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी २०० हून अधिक जणांना अटक करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

कोलकाता येथून अटकेत

### कक्षात उपचार घेत होती १२ बालके

जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर नवजात बालकांसाठी तीन अतिदक्षता कक्ष आहेत. आग लागलेल्या कक्षात त्यावेळी १२ नवजात बालकांवर उपचार सुरू होते. आग आणि धूर लक्षात येताच कर्मचाऱ्यांनी बालकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यास सुरुवात केली. मात्र, या प्रयत्नांदरम्यान तीन नवजात बालकांचा धुरामुळे गुदमरून मृत्यू झाला. या घटनेमुळे बालकांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



असलेला मोहम्मद एजाज हा रौफच्या संपर्कात असल्याचे तपासात समोर आले. तसेच व्हॉट्सॲप आणि इन्स्टाग्रामच्या

### अग्निसुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

विशेष म्हणजे, नवीन इमारतीतील हा नवजात शिशू अतिदक्षता विभाग काही काळापूर्वीच सुरू करण्यात आला होता. कमी वजनाचे, कमी दिवसांचे आणि गंभीर अवस्थेतील नवजात बालकांवर या विभागात उपचार केले जातात. त्यामुळे अशा संवेदनशील विभागात आग लागल्यानंतर अग्निशमन यंत्रणा आणि आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था कितपत सक्षम होती, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

### काही बालकांवर सुपर स्पेशालिटीत उपचार

आगीतून वाचवण्यात आलेल्या काही बालकांना पुढील उपचारांसाठी सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. चार बालकांवर उपचार सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. त्यापैकी एका बालकाची प्रकृती चिंताजनक असून त्याच्या हाताला आणि पायाला भाजल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अन्य काही बालकांना किरकोळ भाजल्याची माहिती आहे. काही बालकांना डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयातही दाखल करण्यात आले आहे.

माध्यमातून पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या संपर्कात असल्याच्या संशयावरून २३ वर्षीय तरुणाला कर्नाटकातील कलबुर्गी येथून अटक करण्यात आली. पश्चिम बंगाल एसटीएफने कूचबिहार जिल्ह्यातून आयएसआयसाठी हेरगिरी केल्याच्या संशयावरून आणखी तीन जणांना ताब्यात घेतले आहे.

# चाकणच्या वाहतूक कोंडीला शिंदेंचा 'मास्टर प्लॅन'

## पायाभूत सुविधा आणि वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तातडीची आणि दीर्घकालीन उपाययोजना

**महाईन्यूज I पुणे**

**चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी आणि येथील उद्योगांचे स्थलांतर रोखण्यासाठी शासन पूर्णपणे सकारात्मक आहे. उद्योजकांना पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी तातडीची आणि दीर्घकालीन पावले उचलली जात असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.**




उपमुख्यमंत्र्यांनी आज तळेगाव, चाकण येथे भेट देवून रस्त्यांची दुरुस्ती कामाची पाहणी तसेच उद्योजकांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, विधान परिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार शरद सोनवणे, आमदार बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्यासह चाकण व तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक, औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी होणाऱ्या विविध ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सद्यस्थितीची माहिती घेतली. यादरम्यान त्यांनी एम-६० हार्डनरचा वापर करून खड्डे बुजवण्याचे काम आणि पावसाने खराब झालेल्या रस्त्यांवर थेट कास्टिंग केलेले पॅचेस बसवण्याच्या कामाची पाहणी केली. या नवीन तंत्रज्ञानामुळे कमी वेळात रस्ता पूर्ववत करून त्यावरून अवजड वाहने सोडणे शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

चाकण-शिक्रापूर मार्गावर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडीचा मोठा फटका उद्योजकांना बसत आहे. पावसाळ्यात पारंपरिक डांबरीकरण टिकत नसल्याने यावर मात करण्यासाठी जिओ पॉलिमर टेक्नो पॅच आणि एम-६ आरएमसी विथ हार्डनरचा वापर केला जात आहे. जिओ पॉलिमर मिश्रणाला अर्धा ते पाऊण तासातच सेट होत असल्याने खड्डे भरल्यानंतर तातडीने वाहतूक सुरू करणे शक्य होत आहे. तसेच सर्वाधिक खराब झालेल्या ठिकाणी प्री-कास्ट पॅनेल ट्रेलरद्वारे आणून थेट बसवण्यात येत आहेत.

औद्योगिक क्षेत्रातील समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष नोडल समिती स्थापन करण्यात आली असून, या समितीची बैठक आता दर शुक्रवारी होणार आहे. रस्ते, ड्रेनेज, फुटपाथ आणि स्ट्रीट लाईट्ससह पायाभूत सुविधांच्या विकासावर या समितीमार्फत भर दिला जाईल. तसेच चाकणमध्ये येणाऱ्या वाहनांची ये-जा सुलभ व्हावी यासाठी तळेगाव ते शिक्रापूर या ५४ किलोमीटर मार्गाची दुरुस्ती, नाशिक फाटा ते राजगुरुनगर रस्ता आणि अंतर्गत रस्ते बांधणीला गती दिली जाणार असून रस्ते बांधताना फुटपाथ, युटिलिटी आणि सायकल ट्रॅकचा समावेश करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

कामगारांच्या प्रवासाचा वेळ वाचावा यासाठी औद्योगिक क्षेत्रात क्लस्टरच्या माध्यमातून कामगार वसाहती (टाउनशिप) उभारण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. तसेच निगडी ते चाकण, चाकण ते राजगुरुनगर आणि तळेगाव ते शिक्रापूर या मेट्रो मार्गांचा विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश महामेट्रो प्राधिकरणाला देण्यात आले आहेत.

उद्योजकांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी एमआयडीसीचे कार्यकारी अभियंते व इतर अधिकारी आठवड्यातून एक दिवस प्रत्यक्ष उपलब्ध राहतील. तसेच उद्योजकांनी आपल्या समस्या मांडण्यासाठी 'मैत्री' ॲपचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन करण्यात आले. वीज ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवून लोडशेडिंगचे नियोजन करणे, स्वतंत्र एजन्सीमार्फत कचऱ्याची विल्हेवाट लावणे तसेच पाणीपुरवठा व पोलीस प्रशासनाशी संबंधित प्रश्न तातडीने सोडवण्याबाबतही बैठकीत निर्णय घेण्यात आले. शासनाच्या या सर्व उपाययोजनांमुळे उद्योजकांच्या समस्यांचे निवारण होऊन त्यांचे समाधान झाले असून, उद्योजकांनी आपले उद्योग बाहेर नेण्याबाबतचे मतपरिवर्तन झाल्याचे यावेळी स्पष्ट केले.

### उद्योगांसाठी महत्त्वाचे निर्णय

चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी तळेगाव-शिक्रापूर ५४ किलोमीटर मार्गाच्या दुरुस्तीला गती देण्यात येणार आहे. यासोबतच निगडी-चाकण, चाकण-राजगुरुनगर आणि तळेगाव-शिक्रापूर मेट्रो मार्गांचा विकास आराखडा तयार केला जाणार आहे. उद्योगांच्या पायाभूत सुविधांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष नोडल समितीही कार्यरत करण्यात आली आहे.

# रुपाली चाकणकरांची बदनामी केल्याप्रकरणी 19 जणांवर गुन्हा दाखल

**महाईन्यूज I पुणे**

**राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची बदनामी केल्याप्रकरणी 19 जणांविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सोशल मीडियावर बदनामीकारक, अश्लील आणि धमकीवजा पोस्ट केल्याचा आरोप चाकणकर यांनी तक्रारीत केला आहे.**

रुपाली चाकणकर यांनी काही दिवसांपूर्वी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी आज गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या प्रकरणात रुपाली पाटील ठोंबरे, सुषमा अंधारे, दिपाली सय्यद, संगीता तिवारी, डॉ. आशा मिरगे, हनुमंत गलगटे, वर्षा कांबळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सोशल मीडिया पदाधिकारी योगेश सावंत, मोहसीन शेख आणि महादेव बालगुडे यांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे.

चाकणकर यांच्या फिर्यादीनुसार, नाशिक येथील ईशान्येश्वर महादेव मंदिराचे अध्यक्ष अशोक एकनाथ खरात यांच्याशी त्यांची सुमारे नऊ वर्षांपूर्वी सामाजिक कार्यक्रमादरम्यान ओळख झाली होती. मंदिरातील धार्मिक कार्यक्रमांनिमित्त त्यांची तेथे उपस्थिती होती.

18 मार्च 2026 रोजी खरात यांना एका बलात्काराच्या गुन्ह्यात अटक झाल्याचे माध्यमांमधून समजल्यानंतर, त्यांच्यासोबतच्या जुन्या सार्वजनिक कार्यक्रमांतील फोटो आणि व्हिडिओचा वापर करून आपल्यावर असंबंधित आरोप करण्यात आल्याचा दावा चाकणकर यांनी केला आहे.



20 मार्च रोजी सोशल मीडिया तपासताना सुमारे 19 फेसबुक, इन्स्टाग्राम आणि यूट्यूब अकाउंटवरून आक्षेपार्ह पोस्ट करण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या पोस्टचे स्क्रीनशॉट आणि इतर पुरावे त्यांनी पोलिसांकडे सादर केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

चाकणकर यांनी आपल्या तक्रारीत विविध व्यक्तींची नावे नमूद केली असून, त्यांच्या पोस्टवर इतर काही व्यक्तींनी लैंगिक, अश्लील आणि अपमानास्पद कमेंट केल्याचा आरोपही केला आहे. या प्रकारामुळे मानसिक त्रास आणि सामाजिक मानहानी झाल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, संबंधित सोशल मीडिया पोस्ट, अकाउंट्स आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पुढील तपास सुरू आहे.

# जिल्हा रुग्णालय होणार सुपर स्पेशालिटी हब!

## जिल्ह्यातील नागरिकांना एकाच छताखाली मिळणार अत्याधुनिक उपचार

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**जिल्हा रुग्णालयाचा विस्तार करून ते अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी रुग्णालय म्हणून विकसित करण्यात येणार असून, रुग्णालयातील १०० खाटांचा 'क्रिटिकल केअर ब्लॉक' महिनाभरात कार्यान्वित करण्याचे निर्देश आमदार शंकर जगताप यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या सुविधेमुळे पिंपरी चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील नागरिकांना गंभीर व आपत्कालीन आजारांवरील अत्याधुनिक उपचार एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत.**




जिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधा, अंतर्गत समस्या आणि प्रलंबित विकासकामांचा आमदार जगताप यांनी सोमवारी (ता. २४) संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत आढावा घेतला. यावेळी त्यांनी एमआरआय, सीटी स्कॅन आणि एक्स-रे युनिटची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

रुग्णालयातील एमआरआय, सीटी स्कॅन, एक्स-रे, बर्न वॉर्ड, एसएनसीयू आणि अतिरिक्त आंतररुग्ण सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. तसेच नव्या १०० खाटांच्या सुविधेत दोन ऑपरेशन थिएटर, आयसीयू, अत्याधुनिक वॉर्ड आणि ओपीडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सुपर स्पेशालिटी उपचार सुविधा पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर नागरिकांना उपचारांसाठी खासगी अथवा दूरच्या रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागणार नाही, असे जगताप यांनी सांगितले.

रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन बाह्यरुग्ण विभागाची (ओपीडी) क्षमता वाढविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. उपलब्ध मनुष्यबळ आणि वैद्यकीय यंत्रसामग्रीचे योग्य नियोजन करून रुग्णांना सर्व सुविधा वेळेत मिळतील, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले. स्वच्छता, ड्रेनेज, पाणी व वीजपुरवठा, अग्निसुरक्षा, औषध भांडार, प्रशासकीय कार्यालय, पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थेचाही आढावा घेण्यात आला.

बर्न वॉर्ड, एसएनसीयू विभाग, अतिरिक्त आंतररुग्ण कक्ष, एसटीपी व ईटीपी प्रकल्प, पोलिस मदत केंद्र आणि रुग्णांच्या नातेवाइकांसाठी प्रतीक्षालयाची प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

> "सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित कामांमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. देशाचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्रजी मोदी यांच्या दूरदृष्टीतून आणि महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रामध्ये आरोग्य सेवा अधिक बळकट होत आहे. याच माध्यमातून हे जिल्हा रुग्णालय अधिक सक्षम, सुरक्षित, सुविधायुक्त आणि रुग्णाभिमुख करण्यासाठी सूचना केल्या आहे. जिल्हा रुग्णालयाचा विस्तार करून ते अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या रूपात रुग्णसेवेत आणण्यासाठी आवश्यक कामांना गती देण्यात येत आहे. रुग्णालयातील १०० खाटांचा 'क्रिटिकल केअर ब्लॉक' लवकरात लवकर कार्यान्वित व्हावा यासाठी प्रत्येक कामाचा नियमित पाठपुरावा केला जाईल."
>
> **- शंकर जगताप,**
> **आमदार, चिंचवड विधानसभा मतदार संघ**

### लिफ्ट, 'पिंक टॉयलेट' आणि सुरक्षेवर भर

रुग्णालयातील सर्व लिफ्ट नियमित व सुरक्षितपणे सुरू ठेवाव्यात, प्रतीक्षालयाचे अद्ययावतीकरण करावे आणि उद्यानातील सुविधा सुस्थितीत ठेवाव्यात, असे निर्देश देण्यात आले. महिलांसाठी रुग्णालय परिसरात आणि बाहेरील भागात 'पिंक टॉयलेट'ची सुविधा उपलब्ध करून देण्याची सूचना करण्यात आली. अंडरपासमध्ये सीसीटीव्ही व पुरेशी प्रकाशव्यवस्था कार्यान्वित ठेवण्याबरोबरच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहनांचे नियोजन करण्यास सांगण्यात आले. कचऱ्याची समस्या दूर करणे, पोलिसांची गस्त वाढविणे तसेच भटकी कुत्री, मांजरे व इतर प्राण्यांमुळे रुग्णांना त्रास होणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही देण्यात आले.

---

# भरतीदरम्यान जुळली मैत्री; दोन महिला पोलिसांचा विवाहाचा निर्णय



**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या दोन महिला पोलीस शिपायांनी एकमेकींसोबत विवाहबद्ध होण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या ३० ऑगस्ट रोजी आळंदी येथे वैदिक पद्धतीने विवाह सोहळा पार पडणार असून, यासाठी दोघींनी प्रशासनाकडे अधिकृत रजेचा अर्ज सादर केला आहे.**

दोन्ही महिला पोलिसांची पहिली भेट पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान झाली. सेवेत रुजू झाल्यानंतर मुख्यालयातील मुक्काम आणि पुढे एकाच पोलीस ठाण्यात ड्युटी केल्याने त्यांच्यातील संवाद वाढला. एकत्र कर्तव्य बजावताना जुळलेली मैत्री अधिक घट्ट झाली आणि त्यांनी आयुष्यभर एकमेकींची साथ देण्याचा निर्णय घेतला.

या विवाहाला दोघींपैकी एका महिला पोलिसाच्या कुटुंबीयांनी आक्षेप घेतला असून, त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे धाव घेत विवाह रोखण्याची विनंती केल्याचे समोर आले आहे. मात्र, हा वैयक्तिक निर्णय असल्याने प्रशासनाने सध्या कारवाईऐवजी गरज भासल्यास समुपदेशनाची भूमिका घेतली आहे. दोघींनीही रजेच्या अर्जासोबत विवाहपत्रिका जोडली आहे.

दरम्यान, विवाहाचा निर्णय घेतलेल्या दोघींपैकी एका कर्मचाऱ्याने मुंबईतील रुग्णालयात लिंगबदलासाठी वैद्यकीय प्रक्रिया सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणामुळे लिंगबदलानंतर शासकीय सेवेत सेवा पुस्तकातील नोंद, आरक्षणातून झालेली नियुक्ती आणि संबंधित प्रशासकीय नियम याबाबतचे प्रश्नही चर्चेत आले आहेत.

यापूर्वी बीडहून बदली झालेल्या एका महिला कर्मचाऱ्याने शासकीय परवानगीने लिंगबदलाची शस्त्रक्रिया केली होती. मात्र, महिला आरक्षणातून झालेल्या भरतीनंतर लिंगबदल झाल्यास सेवा पुस्तकात कोणत्या स्वरूपाची नोंद करावी, याबाबत धोरणात्मक निर्णय अद्याप प्रलंबित असल्याचे प्रशासनासमोरील आव्हान आहे. दोन्ही महिला पोलिसांच्या विवाहाच्या निर्णयामुळे वैयक्तिक निवड, कायदेशीर बाबी आणि शासकीय सेवा नियम याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

### लिंग बदलाचे उपचार सुरु

विवाहाचा निर्णय घेतलेल्या दोघींपैकी एका कर्मचाऱ्याने लिंगबदलासाठी मुंबईतील एका रुग्णालयात वैद्यकीय प्रक्रिया सुरू केल्याचे समोर आले आहे. या समलैंगिक विवाह आणि लिंगबदलाच्या घडामोडींमुळे सामाजिक बदलांसोबतच शासकीय व प्रशासकीय सेवा नियमांसमोरही नवी आव्हाने उभी राहिली आहेत. दरम्यान यापूर्वी बीडहून बदली होऊन आलेल्या एका महिला कर्मचाऱ्याने शासकीय परवानगीने लिंगबदलाची शस्त्रक्रिया केली होती. मात्र, महिला आरक्षणातून झालेली भरती आणि पुरुष कर्मचारी म्हणून सेवा पुस्तकात होणारी नोंद यावर अद्याप शासकीय पातळीवर धोरणात्मक निर्णय प्रलंबित आहे.

### कशी जुळली नात्याची वीण?

भरती प्रक्रियेदरम्यान या दोघींची प्रथम भेट झाली. पोलीस सेवेत रुजू झाल्यानंतर मुख्यालयातील मुक्काम आणि पुढे एकाच पोलीस ठाण्यातील ड्युटीमुळे त्यांच्यातील संवाद वाढला. एकत्र कर्तव्य बजावताना जुळलेली ही मैत्री अधिक घट्ट झाली आणि त्यांनी आयुष्यभरासाठी एकमेकींची साथ देण्याचा निर्णय घेतला.



## भूमिका

**लोकशाहीमध्ये एखादा विषय केवळ राजकीय घोषणांपुरता मर्यादित न राहता जनतेच्या मनाला आणि बुद्धीला स्पर्श करू लागतो, तेव्हा त्याचा व्यापक सामाजिक परिणाम घडतो. सध्या शिक्षणाच्या प्रश्नाभोवती निर्माण होत असलेले वातावरण हे त्याचेच उदाहरण म्हणावे लागेल. जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने शिक्षणव्यवस्थेतील अनेक मूलभूत प्रश्नांना वाचा फोडली.**

# ‘गूंज’ वाढली, शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला




त्यानंतर विविध राज्यांतील विद्यार्थ्यांनी शाळांमधील अपुऱ्या सुविधा, इमारतींची दुरवस्था, शिक्षकांची कमतरता आणि मूलभूत गरजांकडे होणारे दुर्लक्ष याविरोधात आवाज उठवला. शिक्षण हा कोणत्याही देशाच्या विकासाचा पाया आहे. मात्र आपल्या राजकीय चर्चेत धर्म, भाषा, जात, मंदिर आणि इतर भावनिक प्रश्नांना प्राधान्य मिळताना शिक्षणाचा मुद्दा अनेकदा मागे पडतो.

शाळेतील विद्यार्थ्यांना सुरक्षित इमारत, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, पोषण आहार आणि दर्जेदार शिक्षक मिळणे ही त्यांची मूलभूत गरज आहे. या गरजांकडे दुर्लक्ष करून विकासाचे दावे करणे ही मोठी विसंगती आहे. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांच्या ‘छात्रों की गूंज’ या कार्यक्रमाकडे पाहणे आवश्यक आहे.

कोटा, डेहराडून, प्रयागराज आणि पुणे अशा ठिकाणी विद्यार्थ्यांशी संवाद साधून शिक्षणाचा प्रश्न राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न झाला. या कार्यक्रमावर राजकीय हेतूंचे आरोप होऊ शकतात; परंतु एखादा राजकीय पक्ष शिक्षणासारखा व्यापक जनहिताचा विषय आपल्या कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी आणत असेल, तर त्याकडे केवळ पक्षीय चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही.

जंतर-मंतरच्या आंदोलनामुळे एक महत्त्वाची बाब स्पष्ट झाली आहे—विद्यार्थी केवळ परीक्षा, गुण आणि नोकरीपुरते विचार करणारे घटक राहिलेले नाहीत. ते आपल्या शिक्षणाच्या हक्काबद्दल प्रश्न विचारत आहेत. ही जागृती लोकशाहीसाठी आशादायक आहे. विद्यार्थ्यांचा आवाज ऐकून सरकारांनी तात्पुरत्या घोषणा करण्यापेक्षा शिक्षणव्यवस्थेतील दीर्घकालीन त्रुटी दूर करण्याची गरज आहे. शिक्षणाचे राजकीयीकरण होऊ नये, हे जितके खरे आहे तितकेच शिक्षण हा राजकीय अजेंड्याचा महत्त्वाचा विषय असायलाच हवा. कारण शिक्षणाचा प्रश्न प्रत्येक कुटुंबाशी जोडलेला आहे. गरीब असो वा मध्यमवर्गीय, प्रत्येक पालकाला आपल्या मुलाला चांगले शिक्षण मिळावे, अशी अपेक्षा असते. त्यामुळे शिक्षणावरील चर्चा ही पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन राष्ट्रीय प्राधान्य बनली पाहिजे.

‘गूंज’चा खरा अर्थ एखाद्या कार्यक्रमाच्या लोकप्रियतेत नाही, तर त्या आवाजातून निर्माण होणाऱ्या परिवर्तनात आहे. विद्यार्थ्यांचा आवाज धोरणनिर्मितीपर्यंत पोहोचला आणि त्यातून शाळा, शिक्षक, अभ्यासक्रम, सुविधा व विद्यार्थ्यांच्या हक्कांमध्ये मूलभूत सुधारणा झाल्या, तरच या आंदोलनाचा आणि संवादाचा खरा विजय मानता येईल. शिक्षणाचा हा अनुनाद अधिक व्यापक झाला, तर लोकशाही अधिक प्रगल्भ होईल.

## प्रासंगिक »

### लोभाचे बक्षीस

**एका गावात एक धाडसी तरुण राहत होता. एकदा गावाजवळ दोन गटांमध्ये मोठा वाद झाला. एका गटाने शत्रूला पकडून आणणाऱ्याला मोठे बक्षीस देण्याची घोषणा केली. हे ऐकून गावातील अनेक तरुण पैशाच्या लोभाने त्या व्यक्तीचा शोध घेऊ लागले.**

त्यांच्यात गणेश नावाचा तरुणही होता. मात्र त्याच्या आईने त्याला समजावले, “पैशासाठी दुसऱ्याचा जीव धोक्यात घालणे हे शौर्य नाही. खरे शौर्य म्हणजे संकटातही माणुसकी जपणे.”

गणेशने आईचे म्हणणे ऐकले. दुसऱ्या दिवशी त्याला जंगलात जखमी व्यक्ती सापडली. ती त्याच ‘शत्रू’ गटातील होती. गावकऱ्यांनी तिला पकडून नेण्याचा आग्रह केला; पण गणेशने प्रथम तिच्यावर उपचार केले आणि सुरक्षित ठिकाणी पोहोचवले.

ही बातमी सर्वत्र पसरली. गावातील ज्येष्ठांनी गणेशचा सन्मान केला. त्यांनी सांगितले, “बक्षिसासाठी हिंसा करणारा धाडसी नसतो; जीव वाचवणारा खरा शूर असतो.” त्या दिवसापासून गावात संघर्षाऐवजी संवादाला महत्त्व दिले जाऊ लागले.

- तात्पर्य : **लोभापेक्षा माणुसकी मोठी; हिंसेपेक्षा शांतता श्रेष्ठ.**

युद्धभूमीवर शत्रूचा पराभव करण्यासाठी लष्करी सामर्थ्याबरोबरच मानसिक दबावाचाही वापर केला जातो. मात्र शत्रू सैनिकाला ठार मारण्यासाठी किंवा पकडण्यासाठी थेट आर्थिक इनाम जाहीर करण्याची वेळ एखाद्या देशावर येते

# युद्धाचे ‘इनाम’ आणि वाढता संघर्ष



तेव्हा त्या संघर्षाची तीव्रता आणि त्यातील धोकादायक प्रवृत्ती स्पष्ट होते. इराणकडून अमेरिकन सैनिकाला मारणाऱ्या किंवा पकडणाऱ्याला ३० हजार डॉलर, तर हे काम महिलेने केल्यास ६० हजार डॉलर इनाम देण्याची घोषणा ही त्याच चिंताजनक प्रवृत्तीचे उदाहरण आहे.

इराणने या घोषणेला आर्थिक जिहाद आणि अमेरिकेविरोधातील प्रतिकाराचा भाग म्हणून मांडले असले, तरी अशा प्रकारच्या घोषणेमुळे युद्धाचा विस्तार सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा धोका निर्माण होतो. सैनिक हा युद्धाचा भाग असला, तरी त्याला लक्ष्य करण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन देणे आंतरराष्ट्रीय तणाव आणखी वाढवू शकते. विशेषतः महिलेसाठी दुप्पट इनाम जाहीर करण्यामागील संदेशही केवळ आर्थिक नसून प्रतीकात्मक आहे.या संघर्षात इराण आणि कतारमधील पायलटांचा वादही गंभीर आहे. इराणने तीन पायलट कतारच्या ताब्यात असल्याचा आरोप केला आहे, तर कतारने तो स्पष्टपणे फेटाळला आहे. कतारच्या मते, इराणी विमानांनी त्यांच्या हवाई हद्दीत प्रवेश केल्यानंतर संरक्षणात्मक कारवाई करण्यात आली. एका पायलटचा मृतदेह सापडल्याचेही कतारचे म्हणणे आहे. दोन्ही देशांच्या परस्परविरोधी दाव्यांमुळे सत्य परिस्थिती स्पष्ट होणे कठीण झाले आहे. युद्धाच्या काळात माहिती हीदेखील एक शस्त्र बनते. प्रत्येक देश आपली बाजू योग्य ठरविण्यासाठी दावे-प्रतिदावे करतो. त्यातून जनमत प्रभावित होते आणि राजकीय वातावरण अधिक आक्रमक बनते. त्यामुळे अशा घटनांची स्वतंत्र आणि विश्वासार्ह चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. अमेरिका, इराण आणि त्यांच्या सहकाऱ्यांमधील संघर्षाचा परिणाम केवळ संबंधित देशांपुरता मर्यादित राहणार नाही. होर्मुज सामुद्रधुनीसारखा महत्त्वाचा जलमार्ग अस्थिर झाल्यास जागतिक ऊर्जा बाजारावर, तेलाच्या किमतीवर आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावर त्याचा परिणाम होऊ शकतो.

भारतासारख्या ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या देशासाठी ही बाब विशेष चिंतेची आहे. युद्धात विजयाची भाषा जितकी आक्रमक होते, तितकी शांततेची संधी दूर जाते. सैनिकांवर इनाम, पायलटांवरील आरोप आणि जलमार्गांवरील नियंत्रणाची धमकी या सर्व घटनांनी संघर्ष अधिक धोकादायक टप्प्यावर पोहोचत असल्याचे दिसते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायाने केवळ लष्करी हालचालींकडे न पाहता संवाद, मध्यस्थी आणि युद्धबंदीच्या प्रयत्नांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. कारण युद्ध जिंकणारा कोण असला, तरी त्याची खरी किंमत शेवटी सामान्य माणसालाच मोजावी लागते.

## ।। अभंगवाणी ।।



पवित्र सोंवळीं ।
एक तीं च भूमंडळीं ॥१॥

ज्यांचा आवडता देव ।
अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ईसीएमएसमध्ये महाराष्ट्राची बाजी; विदर्भ मात्र ‘आऊट’!

## राज्यात १४ प्रकल्पांना मंजुरी; नागपूरसह विदर्भातील एकाही शहराला संधी नाही

**महाईन्यूज । नागपूर**

**देशातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाची पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या इलेक्ट्रॉनिक्स कॉम्पोनंट मॅन्युफॅक्चरिंग स्कीम (ईसीएमएस) अंतर्गत महाराष्ट्रातील १४ प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. मात्र, राज्यातील महत्त्वाचे औद्योगिक आणि लॉजिस्टिक केंद्र असलेल्या नागपूरसह विदर्भातील एकाही शहराला या योजनेत स्थान मिळालेले नाही. त्यामुळे औद्योगिक क्षमता, पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध असतानाही विदर्भाला या योजनेपासून दूर का ठेवण्यात आले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.**



मोबाइल, संगणक, दूरसंचार उपकरणे, वाहनांमधील इलेक्ट्रॉनिक्स, औद्योगिक उपकरणे आणि स्मार्ट उपकरणांसाठी आवश्यक घटक देशांतर्गत तयार करण्याची क्षमता वाढविणे हा ईसीएमएसचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे ही योजना केवळ एखादा कारखाना उभारण्यापुरती मर्यादित नसून, देशात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाची संपूर्ण पुरवठा साखळी विकसित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.

ईसीएमएसमध्ये प्रिंटेड सर्किट बोर्ड (पीसीबी), पॅसिव्ह कॉम्पोनंट्स, इलेक्ट्रो-मेकॅनिकल घटक, सब-असेंब्ली, कॅमेरा मॉड्यूल्स, ऑप्टिकल ट्रान्सिव्हर्स तसेच इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनासाठी आवश्यक कॅपिटल गुड्स या क्षेत्रांतील गुंतवणुकीला चालना दिली जात आहे. महाराष्ट्रात मंजूर झालेले १४ प्रकल्प पुणे, सातारा, अहिल्यानगर, नाशिक, ठाणे, पालघर आणि छत्रपती संभाजीनगर या सात जिल्ह्यांमध्ये वितरित झाले आहेत.

### ‘पीसीबी’पासून कॅमेरा मॉड्यूलपर्यंत संधी

ईसीएमएसमुळे इलेक्ट्रॉनिक्स घटक निर्मितीला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. एखाद्या शहरात प्रकल्प आल्यास त्यासोबत पुरवठादार, पॅकेजिंग, लॉजिस्टिक्स, देखभाल, अभियांत्रिकी सेवा आणि अन्य पूरक उद्योगांची साखळी विकसित होऊ शकते. त्यामुळे नागपूरसारख्या मध्य भारतातील महत्त्वाच्या लॉजिस्टिक केंद्राला या योजनेत स्थान मिळणे औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकले असते.

### सेमीकंडक्टर डिझाइनमध्ये संधी, उत्पादनात मात्र प्रतीक्षा

नागपूरमध्ये सेमीकंडक्टर डिझाइनच्या क्षेत्रात क्षमता निर्माण होत असल्याचेही या पार्श्वभूमीवर अधोरेखित होत आहे. देशातील २४ कंपन्यांपैकी नागपुरातील दोन कंपन्यांना डिझाइन लिंक्ड इन्सेन्टिव्ह (डीएलआय) अंतर्गत मदत मिळत आहे. त्यामुळे शहरात सेमीकंडक्टर डिझाइनसाठी स्टार्टअप इकोसिस्टम विकसित होत असताना, इलेक्ट्रॉनिक्स घटकांच्या प्रत्यक्ष उत्पादन साखळीत मात्र नागपूरला अद्याप स्थान मिळालेले नाही. या विरोधाभासामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने ईसीएमएसमध्ये संधी का मिळाली नाही, हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे.

# कांदा आणतोय डोळ्यात पाणी! किरकोळ दर थेट ६० रुपयांवर

**महाईन्यूज । पुणे**

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या दोन महिला पोलीस शिपायांनी एकमेकींसोबत विवाहबद्ध होण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या ३० ऑगस्ट रोजी आळंदी येथे वैदिक पद्धतीने विवाह सोहळा पार पडणार असून, यासाठी दोघींनी प्रशासनाकडे अधिकृत रजेचा अर्ज सादर केला आहे.**



कांद्याच्या प्रमुख उत्पादक पट्ट्यात पावसाने ओढ दिल्याने नवीन कांद्याची लागवड आणि बाजारातील आवक लांबणीवर पडली आहे. त्यातच स्थानिक मागणीसह निर्यातीची मागणी कायम असल्याने कांद्याच्या दरात या आठवड्यात मोठी वाढ झाली आहे. गुलटेकडी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (दि. २३) कांद्याचे दर ३६० ते ४२० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत पोहोचले. त्याचा थेट परिणाम किरकोळ बाजारावर झाला असून, मागील आठवड्यात ३० ते ३५ रुपये किलो असलेला कांदा आता ५५ ते ६० रुपये किलोवर पोहोचला आहे. त्यामुळे सामान्य ग्राहकांच्या घरगुती बजेटवर महागाईचा अतिरिक्त भार पडला आहे.

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डात पुणे जिल्ह्यासह श्रीगोंदा, पारनेर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध भागांतून कांद्याची आवक होते. एरवी रविवारी बाजारात सुमारे १०० ट्रक कांदा दाखल होतो. सध्या बाजारातील एकूण आवक समाधानकारक असली, तरी त्यामध्ये दुय्यम दर्जाच्या कांद्याचे प्रमाण अधिक आहे. चांगल्या दर्जाचा कांदा तुलनेने कमी असल्याने त्याला चढे दर मिळत आहेत.

यंदाच्या तीव्र उन्हाळ्यासह झालेल्या अवकाळी पावसाचा परिणाम चाळींमध्ये साठवून ठेवलेल्या कांद्यावर झाला आहे. मोठ्या प्रमाणात कांदा खराब झाल्याने त्याची टिकवण क्षमता कमी झाली आहे. चाळीत अधिक काळ कांदा साठवून ठेवल्यास नुकसान होण्याची शक्यता असल्याने अनेक शेतकरी तो रोखून न धरता बाजारात विक्रीसाठी पाठवत आहेत. त्यामुळे बाजारातील आवक चांगली दिसत असली तरी दर्जेदार कांद्याचा पुरवठा मर्यादित आहे.

दुसरीकडे, कांदा उत्पादक पट्ट्यात पावसाचे प्रमाण सर्वत्र समाधानकारक नसल्याने नवीन कांद्याची लागवडही प्रभावित झाली आहे. नवीन लागवड एकाचवेळी न होता टप्प्याटप्प्याने होण्याची शक्यता आहे. परिणामी, नवीन कांद्याची नियमित आणि मोठ्या प्रमाणातील आवक सुरू होण्यासाठी आणखी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

### दर्जेदार कांद्याचे दर तेजीत राहण्याची शक्यता

“बाजारात कांद्याची आवक चांगली असली तरी दर्जेदार कांद्याचे प्रमाण कमी आहे. कांदा उत्पादक पट्ट्यात पावसाचे प्रमाण समाधानकारक नसल्याने नवीन कांद्याची लागवड टप्प्याटप्प्याने होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नवीन मालाची नियमित आवक सुरू होण्यासाठी आणखी कालावधी लागेल. तोपर्यंत दर्जेदार कांद्याचे दर तेजीत राहण्याची शक्यता आहे,” असे कांदा व्यापारी रितेश पोमण यांनी सांगितले.

# भारताने अमेरिकेला सुनावलं!

## ‘No Questions’ वादावर प्रतिक्रिया; VVIP च्या शिष्टाचाराविषयी स्पष्टच सांगितलं

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील भेटीदरम्यानच्या संभाषणाविषयी केलेल्या दाव्यांना भारताने फेटाळले आहे. कोणत्याही व्हीव्हीआयपी दौऱ्यापूर्वी नेते माध्यमांशी कशा प्रकारे संवाद साधतील, यावरील चर्चा ही एक सामान्य प्रक्रिया असते, असं भारताने म्हटलं आहे.**



सरकारी सूत्रांनी सांगितलं की, “नेत्यांच्या जाहीर कार्यक्रमांच्या नियोजनाबाबत चर्चा करणे ही कोणत्याही व्हीव्हीआयपी दौऱ्यापूर्वीची एक सामान्य प्रक्रिया आहे. यादरम्यान भारतीय पक्षाने अशा दौऱ्यांसाठीच्या आपल्या मानक प्रक्रियेबद्दल माहिती दिली होती.” पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांच्यातील भेटीदरम्यान पत्रकारांनी कोणतेही प्रश्न विचारू नयेत अशी विनंती भारतीय बाजूने अमेरिकेला केली होती, मात्र ट्रम्प शेवटी ही विनंती विसरले आणि त्यांनी प्रश्न घेतले, असा दावा गोर यांनी केला होता. त्यांच्या या दाव्यानंतर भारताकडून ही प्रतिक्रिया आली आहे.



पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांच्यातील भेटीचा प्रसंग सांगताना गोर म्हणाले होते की, हा जाहीर कार्यक्रम कशा प्रकारे पार पडेल याबाबत एक सामंजस्य झाले होते. गोर यांनी सांगितलं की, त्यांनी आणि ट्रम्प यांनी आगामी बैठकीबाबत खाजगीत चर्चा केली होती. त्यावेळी भारताकडून कोणते मुद्दे उपस्थित केले जाऊ शकतात आणि नवी दिल्लीची काही विशेष विनंती आहे का, असे ट्रम्प यांनी विचारले होते.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची एकच मागणी होती की, माध्यमांना आत येऊ द्यावं पण पूर्ण पत्रकार परिषद घेऊ नये, अशी आठवण गोर यांनी सांगितली. गोर म्हणाले, “मी राष्ट्राध्यक्षांना सांगितलं की भारतीयांची इच्छा आहे की प्रश्न विचारले जाऊ नयेत. त्यावर ट्रम्प म्हणाले, नक्कीच, काही हरकत नाही.” यानंतर पत्रकार आणि सुमारे ५० कॅमेऱ्यांच्या उपस्थितीत बैठक सुरू झाली. मात्र, पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांनी आपले सुरुवातीचे वक्तव्य पूर्ण केल्यानंतर, ट्रम्प पत्रकारांकडे वळले आणि त्यांनी विचारले, “काही प्रश्न आहेत का?” यानंतर प्रश्नोत्तर सुरू झाले.

### ‘मानक प्रक्रिया’ म्हणजे काय?

प्रशासकीय प्रमुखांचा समावेश असलेल्या उच्चस्तरीय बैठकांचं नियोजन सहसा अगदी बारीक तपशीलांसह केलं जाते. यामध्ये दोन्ही नेते कुठे उभे राहतील, संयुक्त निवेदन प्रसिद्ध केलं जाईल का, माध्यमांना खोलीत प्रवेश दिला जाईल का, हा संवाद किती वेळ चालेल आणि प्रश्न घेतले जातील का, या सर्व गोष्टींचा समावेश असतो. दोन्ही नेते एकत्र जाहीरपणे समोर येण्यापूर्वी, दोन्ही बाजूंकडून सहसा या नियोजनाचा समन्वय साधला जातो. यातील मुख्य फरक असा आहे की, जाहीर कार्यक्रमाच्या स्वरूपाविषयी विनंती करणं किंवा आपली पसंती कळवणं वेगळं आणि दुसऱ्या नेत्याच्या उत्तरांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणं वेगळं.

# 'कॉक्रोच जनता पार्टी'चा दिल्लीत ५ सप्टेंबरला शांतता मोर्चा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**द कॉक्रोच जनता पार्टी अर्थात CJP ने येत्या ५ सप्टेंबरला दिल्लीत शांतता मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. तसंच देशभरात शांतता मोर्चा काढण्याचं आवाहनही तरुणाईला केलं आहे. दिल्लीत येत्या ५ सप्टेंबरला शांतता मोर्चा काढण्यात येईल. जुलै महिन्यात जे आंदोलन मागे घेण्यात आलं त्यातली एक अट सरकारने अद्याप पूर्ण केलेली नाही. त्यामुळे CJP ने हा निर्णय जाहीर केला आहे. सगळ्या आंदोलकांवरचे गुन्हे मागे घेतले जातील ही देखील अट सरकारने मान्य केली होती. पण अद्याप हे गुन्हे मागे घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळेच दिल्लीत आता शांतात मोर्चा काढला जाईल असं CJP ने जाहीर केलं आहे.**



कॉक्रोच जनता पार्टीने हे म्हटलं आहे की येत्या ५ सप्टेंबरला आम्ही दिल्लीत शांतता मोर्चा काढणार आहोत. अशा शांतता आंदोलनाचं देशभरात आयोजन केलं जावं असंही आवाहन त्यांनी केलं आहे. केंद्र सरकारने २५ जुलैला जी आश्वासनं दिली होती त्यानंतर आम्ही आमचं जंतर-मंतरवरचं आंदोलन मागे घेतलं होतं. मात्र अजूनही आंदोलकांवरचे गुन्हे मागे घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळे आम्ही येत्या ५ सप्टेंबरला शांतता मोर्चाचं आयोजन केलं आहे. इंडिया गेट या ठिकाणाहून हे आंदोलन सुरु होईल. नवी दिल्लीच्या पोलीस मुख्यालयापर्यंत आमचा मोर्चा असेल असं CJP ने स्पष्ट केलं आहे. नीट परीक्षा देणारे विद्यार्थी, नीट परीक्षा रद्द झाल्याने आत्महत्या केलेल्या मुलांचे आई वडील, २० जुलैला ज्यांनी ज्यांनी पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या ते सगळेजण या शांतता मोर्चात सहभागी होणार आहेत असंही CJP ने स्पष्ट केलं आहे.

नीटच्या पेपरफुटीनंतर विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु झालं होतं. CJP अर्थात कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वात हे आंदोलन सुरु होतं. धर्मेंद्र प्रधान यांनी नीट पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे अशी प्रमुख मागणी होती. २० जुलैला या विद्यार्थ्यांनी संसद मार्चही काढला होता. ज्यावर लाठीचार्ज करण्यात आला. यानंतर २५ जुलैला आंदोलक विद्यार्थ्यांवरचे गुन्हे मागे घेतले जातील ही मागणीही मान्य करण्यात आली होती. तसंच धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याने या आंदोलनाला मोठं यश मिळालं होतं त्यामुळे हे आंदोलन मागे घेण्यात आलं. आता अजूनही गुन्हे मागे घेण्यात आलेले नाहीत त्यामुळे CJP ने शांतता मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली आहे.



# कंगनाचा तापसीवर निशाणा!

बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नू आणि कंगना रनौत यांच्यातील जुना वाद पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. दोन्ही अभिनेत्रींच्या सोशल मीडिया पोस्ट आणि वक्तव्यांमुळे यापूर्वीही अनेकदा वाद निर्माण झाले आहेत. आता तापसीच्या एका वक्तव्यावर कंगनाने टीका केल्यानंतर तापसीने थेट कंगनाचं नाव न घेता एक सूचक पोस्ट शेअर केली आहे. तापसी सध्या तिच्या आगामी 'गंधारी' या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. याचदरम्यान तिने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक छोटीशी पोस्ट शेअर केली. या पोस्टमध्ये तिने केवळ 'साबित हो गया' असे लिहिले. तापसीने कंगनाचे नाव घेतले नसले तरी तिची ही पोस्ट कंगनाच्या ताज्या वक्तव्याशी संबंधित असल्याचे सोशल मीडियावर बोलले जात आहे. काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत तापसीला कंगनासोबतचा जुना वाद संपवण्याबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर तापसीने सांगितले की, ती कंगनाला कधी भेटलेली नाही. कंगनाबद्दल तिचे जे मत आहे, ते तिची संगोपन, इतरांशी बोलण्याची पद्धत आणि गोष्टींकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोन यावर आधारित असल्याचे तापसीने म्हटले होते. तापसीच्या या वक्तव्यानंतर कंगनाने सोशल मीडियावर तिच्यावर निशाणा साधला. कंगनाने तापसीला 'स्वस्त कॉपी' असे संबोधले. एवढेच नाही तर कंगनाने तापसीच्या संगोपनावर आणि तिच्या आई-वडिलांवरही भाष्य केले. कंगनाने आपल्या पोस्टमध्ये पालकांचा उल्लेख करताना प्रत्येक आई-वडील आपल्या मुलांसाठी त्यांच्या परीने प्रयत्न करत असतात, असे म्हटले. तसेच कोणत्याही वादामध्ये आपण संबंधित व्यक्तीच्या आई-वडिलांना ओढत नसल्याचेही कंगनाने सांगितले. कंगनाच्या या पोस्टनंतर दोन्ही अभिनेत्रींच्या जुन्या वादाची पुन्हा सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली. चाहत्यांकडून त्यांच्या जुन्या वक्तव्यांचीही आठवण करून दिली जात आहे.



# सोनाली सहगलचे बॉलिवूडमध्ये पुनरागमन

आई झाल्यावर आता अभिनेत्री सोनाली सहगल काम अन् घरादरम्यान संतुलन साधून स्वत:चा वेळ अन् अटींनुसार काम करत आहे. तिचा चित्रपट आर्यभट्ट का झिरो अलिकडेच प्रदर्शित झाला आहे. आई झाल्यावर पुन्हा कामावर परतण्याची उत्सुकता असताना काही प्रमाणात नर्व्हस देखील होती असे सोनालीचे सांगणे आहे. मागील दीड वर्षांमध्ये मी फारसे काम केले नव्हते. आर्यभट्ट का झिरो चित्रपटाच्या प्रमोशनवेळी माझी आई अन् मुलगी सोबत होती. या चित्रपटाद्वारे माझी बॉलिवूडमध्ये वापसी झाल्याने आनंदी आहे. आता माझे निर्णय बऱ्याचअंशी मुलीवर निर्भर असतात, कारण मला तिलाही वेळ द्यायचा आहे. किती तास देऊ शकेन, लोकेशन कोणते आहे, माझी मुलगी तेथे येऊ शकते की नाही याचा विचार करून मी प्रोजेक्ट निवडणार आहे. आता मला केवळ समाधानासाठी काम करायचे असल्याचे सोनाली सांगते. स्वत:च्या बाळासोबत माझा एक नित्यक्रम ठरला आहे. तिला झोपविणे, अन्न भरविणे, रात्री झोपण्यापूर्वी गोष्टी ऐकविणे हे मीच करते. निर्माते ही गोष्ट समजून घेतील अशी अपेक्षा करू शकते. तसेच निर्णय प्रोजेक्टच्या स्वरुपावरही अवलंबून असतो. अनेक प्रोजेक्टमध्ये वेळ अधिक द्यावा लागत असतो. अनेकदा लोकेशनच्या अडचणी असतात. कलाकार म्हणून मी स्वत:चे पूर्ण योगदान देणार आहे, परंतु निर्मात्यांनीही माझी स्थिती समजून सेटवर प्राथमिकता देणे आवश्यक असल्याचे सोनालीने म्हटले आहे.

# 'आश्रम 4'च्या शूटिंगला सुरुवात

आश्रम या लोकप्रिय वेबसिरीजच्या तिसऱ्या सीझनला यश मिळाल्यानंतर दिग्दर्शक प्रकाश झाँ यांनी चौथ्या सीझनची घोषणा केली होती. आता या सीझन संदर्भात एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. या वेबसिरीजचे दिग्दर्शक आणि निर्माते प्रकाश झाँ यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत चौथ्या सीझनच्या चित्रीकरणाला सुरुवात झाल्याची माहिती दिली आहे. 'आश्रम ४' ची घोषणा करताना सोशल मीडियावरील इन्स्टाग्राम पोस्टमध्ये एक फोटो शेअर करण्यात आला आहे. त्यामध्ये एक मूव्ही क्लिपबोर्ड दिसत असून, त्यावर 'एक बदनाम आश्रम' असे लिहिलेले आहे. हा फोटो शेअर करताना प्रकाश झाँ यांच्या प्रोडक्शन हाऊसने कॅप्शनमध्ये लिहिले आहे, "आणखी एक सुरुवात. आश्रमाच्या एका नवीन अध्यायात आपले स्वागत आहे. आश्रम ४ चे चित्रीकरण सुरू आहे." 'आश्रम' (सीझन १) २०२० मध्ये, 'आश्रम चॅप्टर २' (सीझन २) २०२० मध्ये आणि 'आश्रम ३' (सीझन ३) २०२२ मध्ये प्रदर्शित झाला होता. या तिन्ही सीझन्सला प्रेक्षकांकडून जबरदस्त प्रतिसाद मिळाला. आता चौथ्या सीझनच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली असून, हा सीझन कधीपर्यंत प्रेक्षकांच्या भेटीला येणार याबाबत माहिती समोर आलेली नाही.



# ध्रुव जुरेलचं उत्कृष्ट शतक!

## श्रीलंकेत शतक करताच हातावरील 'तो' टॅटू दाखवत केलं सेलिब्रेशन

**महाईन्यूज । कोलंबो**

**ध्रुव जुरेलने कमालीची खेळी करत कोलंबो कसोटीत शतक झळकावलं आहे. ९९ धावांवर खेळत असताना ध्रुव जुरेलला एक धाव काढण्यासाठी अक्षरशः २१ चेंडू वाट पाहावी लागली. पण अखेरीस त्याने चेंडू टोलवर एक धाव घेण्यासाठी धावला, धावबाद होता होता त्याने आपलं शतक पूर्ण केलं. जुरेलने ९ चौकारांसह आपली शतकी खेळी साकारली. यानंतर त्याने हातावरील टॅटू दाखवत आपलं शतक साजरं केलं.**




ध्रुव जुरेल शतकाच्या जवळ पोहोचताच दुसऱ्या डावात कोलंबोमध्ये आभाळ भरून आलं होतं. काळ्या ढगांनी कोलंबोमध्ये गर्दी केली होती. पण वरूण राजाने उपस्थिती न लावल्याने सामना तसाच सुरू होता. त्यामुळे ध्रुवचं शतक होईपर्यंत पावसाने हजेरी लावू नये, अशी प्रार्थना सर्वच चाहते करत होते. पण ९१ धावांवर असताना जुरेलने चौकार मारताच पावसाने जोरदार हजेरी लावली आणि सामना थांबवावा लागला. त्यानंतर टी-ब्रेकदेखील घेण्यात आला. यानंतर पावसामुळे व ओल्या आऊटफिल्डमुळे सामना सुरू होण्यासाठी विलंब झाला. सामना सुरू झाल्यानंतर जुरेलने झटपट ४ धावा केल्या. पण त्याला शतकासाठी १ धाव पूर्ण करण्याकरता २१ चेंडू वाट पाहावी लागली.

अखेर धावबाद होता होता वाचल्यानंतर ध्रुवने आपलं शतक पूर्ण केलं. ध्रुव धावबाद होणार का असं चित्र दिसताच ड्रेसिंग रूममध्ये खेळाडूंनी डोक्याला हात लावला, पण जुरेलने मात्र डाईव्ह करत एक धाव पूर्ण केली आणि शतक पूर्ण केलं. ध्रुवचं शतक पूर्ण होताच मोहम्मद सिराजने येऊन त्याला मिठी मारली. यानंतर त्याने हेल्मेट काढच आपल्या शतकाचं सेलिब्रेशन केलं. ध्रुवने बॅट व हेल्मेट मैदानावर ठेवत त्याच्या डावा हाताच्या दंडावरील टॅटू दाखवत खास सेलिब्रेशन केलं. ध्रुवने हातावर 'जय जवान, जय किसान' हा टॅटू काढला आहे. ध्रुवचे वडील भारतीय सैन्यात होते. तो मैदानावरील खेळीनंतर कायम सॅल्युट करत वडिलांना व भारतीय सैन्याला अभिवादन करतो.

दुसऱ्या दिवशी ध्रुव जुरेल व सारांश जैन यांनी डावाला सुरूवात केली. दुसऱ्या दिवशी पहिल्याच सत्रात सारांश जैन झेलबाद झाल्यानंतर ऋषभ पंत व ध्रुव जुरेलच्या जोडीने संघाचा डाव सावरला आणि ११२ धावांची भागीदारी साकारली. ऋषभ पंत बाद झाल्यानंतर मोहम्मद सिराजने ध्रुवला चांगली साथ दिली. सिराजने कमालीचा डिफेन्स दाखवत जुरेलच्या शतकामध्ये मोठी भूमिका बजावली. सिराजने २९ चेंडूत ३ धावा करत त्याला साथ दिली.

ध्रुव जुरेल अखेरीस १७७ चेंडूत ९ चौकार व २ षटकारांसह ११५ धावा करत नाबाद परतला. भारताने पहिल्या डावात ५०० धावांचा पल्ला करताच भारताचा कर्णधार शुबमन गिलने डाव घोषित केला. यासह पहिल्या डावात भारताने ९ बाद ५०३ धावा केल्या.

### जुरेलने इतिहास घडवला

ध्रुव जुरेलचं हे शतक ऐतिहासिक ठरलं, कारण श्रीलंकेच्या भूमीवर कसोटी शतक झळकावणारा तो पहिलाच भारतीय यष्टिरक्षक ठरला आहे. यापूर्वी, २०१० मध्ये एम एस धोनीने श्रीलंकेत ७६ धावांची खेळी केली होती. जुरेलने सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना ही कामगिरी केली. श्रीलंकेत एखाद्या भारतीय खेळाडूने या क्रमांकावर फलंदाजी करून शतक झळकावण्याची ही पहिलीच वेळ आहे. जुरेलने असिथा फर्नांडोच्या चेंडूवर एक धाव घेत १७१ चेंडूमध्ये आपले शतक पूर्ण केलं. विदेशात सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना शतक झळकावणारा ध्रुव जुरेल हा केवळ सातवा भारतीय फलंदाज आहे.

# ICCची कठोर कारवाई! यशस्वी जैस्वाल-असिथा फर्नांडो यांना ठोठावला दंड

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयसीसीने (ICC) यशस्वी जैस्वाल व असिथा फर्नांडो यांच्यातील वादावर कठोर भूमिका घेतली आहे. कोलंबोमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी, जैस्वाल आणि श्रीलंकेचा खेळाडू असिथा फर्नांडो यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. त्या दोन्ही खेळाडूंना वेगळं करण्यासाठी इतर खेळाडू व पंचांना मध्यस्थी करावी लागली. आयसीसीने या घटनेची दखल घेत दोन्ही खेळाडूंना दंड ठोठावला आहे.**



### कशावरून झाला वाद?

सामन्याच्या पहिल्या दिवशी पहिल्या डावातील १७ व्या षटकात ही घटना घडली. श्रीलंकेच्या असिथा फर्नांडोने यशस्वी जैस्वालला बोल्ड करत बाद केलं. बाद झाल्यानंतर जैस्वाल मैदानाबाहेर जात असताना फर्नांडोच्या वाक्यामुळे तो त्याच्या दिशेने गेला आणि त्यांच्यात शाब्दिक चकमक झाली. बोलताना दोघं एकमेकांच्या फार जवळ गेले होते आणि बाचाबाची दरम्यान यशस्वी जैस्वालने हेल्मेट त्याच्या डोक्यावर मारलं आणि फर्नांडोने त्याला धक्का दिला. पंचांनी मध्यस्थी करून दोन्ही खेळाडूंना वेगळं केलं. त्यानंतर अशी माहिती मिळाली आहे की, दोन्ही खेळाडूंनी आपली चूक मान्य केली आहे, त्यामुळे याप्रकरणी पुढील सुनावणीची आवश्यकता भासणार नाही.

आयसीसीने या दोन्ही खेळाडूंवर कारवाई केलेली असली तरी दिलासादायक बाब म्हणजे यापैकी कोणावरही पुढील सामने खेळण्यावर बंदी घालण्यात आलेली नाही. या वादादरम्यान असिथा फर्नांडोने यशस्वी जैस्वालला ढकललं होतं, तर जैस्वालने त्याला हेल्मेट मारलं होतं. या हाणामारीवरून त्यांच्यावर सामने खेळण्यावर बंदी घातली जाऊ शकते अशी शक्यता वर्तवली होती.

कोलंबो कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज असिथा फर्नांडो यांच्यात बाचाबाची झाली. खेळाडू, पंच, सामनाधिकारी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीशी अयोग्य शारीरिक संपर्क साधण्याशी संबंधित असलेल्या 'आचारसंहितेच्या कलम २.१२' चे उल्लंघन केल्याबद्दल आयसीसीने (ICC) त्यांना दोषी ठरवलं. आयसीसीने (ICC) जाहीर केलं आहे की, यशस्वी जैस्वाल आणि असिथा फर्नांडो यांना त्यांच्या सामना शुल्काच्या (मॅच फी) २५ टक्के दंड आणि प्रत्येकी एक 'डिमेरिट पॉइंट' ठोठावण्यात आला आहे. ही शिक्षा सौम्य असल्याचं मानलं जात आहे, कारण या दोन्ही खेळाडूंनी गेल्या २४ महिन्यांत यापूर्वी कोणताही गुन्हा केलेला नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।

दि. 25 ऑगस्ट 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# स्वदेशा हाऊसिंग सोसायटीत स्वच्छतेसाठी श्रमदानाचा आदर्श

## ‘आपली सोसायटी,आपली स्वच्छता’ उपक्रमाला रहिवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**स्वदेशा हाऊसिंग सोसायटी परिसर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी सोसायटीच्या वतीने ‘आपली सोसायटी, आपली स्वच्छता’ या अभिनव उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत महिन्यातील दोन रविवार प्रत्येकी दोन तास सोसायटीच्या स्वच्छतेसाठी श्रमदान करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. रहिवाशांनी स्वतः पुढाकार घेत या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला.**



या श्रमदान मोहिमेदरम्यान सोसायटी परिसरातील वाढलेले गवत,दगड,कचरा तसेच इतर अनावश्यक वस्तू हटविण्यात आल्या.तसेच परिसरातील उद्यान आणि खेळाच्या जागेची स्वच्छता करण्यात आली. त्यामुळे या जागांचा रहिवाशांना अधिक चांगल्या पद्धतीने वापर करता यावा, यासाठीही प्रयत्न करण्यात आले.

केवळ स्वच्छता कर्मचाऱ्यांवर अवलंबून न राहता ‘आपली सोसायटी ही आपलीच जबाबदारी’ या भावनेतून रहिवाशांनी स्वतः श्रमदान करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वच्छतेसोबतच पर्यावरण संवर्धन, नागरिकांमध्ये सामाजिक सहभाग आणि एकोपा वाढविणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या उपक्रमाची संकल्पना उपाध्यक्ष, सोसायटी फेडरेशन तथा चेअरमन, स्वदेशा हाऊसिंग सोसायटी यांची असून,प्रवीण सिंग यांच्या पुढाकारानेही मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाला. तेजस खांडगे, सिराज शेख, संदीप डोलतोडे, श्रीकांत बडे, आदित्य बोधे, स्वराज किल्लेदार, सुधीर महाले, अभिषेक भोसले, गिरीजेश यादव, बाबाजी फापाळे, सचिन उपाळे आणि निखिल मुटक यांच्यासह सोसायटीतील सभासदांनी श्रमदान मोहिमेत सहभाग घेतला.

नियमित श्रमदानाच्या माध्यमातून सोसायटीचा परिसर स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासोबतच रहिवाशांमध्ये एकजूट व सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भविष्यातही हा उपक्रम सातत्याने राबवून स्वच्छ, सुंदर आणि निरोगी सोसायटी घडविण्याचा निर्धार रहिवाशांनी केला आहे.

‘दोन तास श्रमदानाचे,आपल्या सोसायटीच्या सुंदर भविष्यासाठी !’ या संदेशातून स्वच्छतेचा आणि सामाजिक सहभागाचा नवा आदर्श स्वदेशा हौसिंग सोसायटीने निर्माण केला आहे.

> स्वच्छता ही केवळ स्वच्छता कर्मचाऱ्यांची जबाबदारी नसून, आपल्या प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपली सोसायटी स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रत्येक रहिवाशाने स्वतः पुढाकार घेणे आवश्यक आहे. त्यामुळे ‘आपली सोसायटी, आपली स्वच्छता’ या संकल्पनेतून महिन्यातील दोन रविवार प्रत्येकी दोन तास श्रमदान करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाला सभासदांचा मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद निश्चितच प्रेरणादायी आहे. श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छतेसोबतच नागरिकांमध्ये सामाजिक बांधिलकी, एकोपा आणि पर्यावरण संवर्धनाची भावना वाढीस लागावी, हा आमचा प्रयत्न आहे. भविष्यातही हा उपक्रम सातत्याने राबवून स्वदेशा हाऊसिंग सोसायटीचा परिसर स्वच्छ, सुंदर आणि आदर्श बनविण्याचा आमचा निर्धार आहे.
>
> **- निलेश खांडगे पाटील, उपाध्यक्ष, सोसायटी फेडरेशन तथा चेअरमन, स्वदेशा हाऊसिंग सोसायटी**

## 'महाराष्ट्र केसरी २०२६-२७'ची लढत नागपुरात; 'महिला महाराष्ट्र केसरी' वाशिममध्ये

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्रातील कुस्ती क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ रोजी पिंपरी-चिंचवडमधील पुनावळे येथे उत्साहात पार पडली. या सभेत २०२६-२७ ची वरिष्ठ गट गादी व माती राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा तसेच प्रतिष्ठेच्या ‘महाराष्ट्र केसरी’ किताबाची लढत नागपूर येथे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन वाशिम येथे करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.**




### मान्यवर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

या वार्षिक सर्वसाधारण सभेला महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तथा खासदार रामदासजी तडस, कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, उपाध्यक्ष हनुमंत गावडे, संजय तीरथकर, विलास कथुरे, सरचिटणीस योगेश दोडके, भारत केसरी विजय गावडे, तांत्रिक अधिकारी दिनेश गुंड यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड कुस्तीगीर संघाचे संतोष माचुत्रे यांनी सभेचे सूत्रसंचालन केले, तर काळुराम कवितके यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी पिंपरी-चिंचवड कुस्तीगीर संघाचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुनावळे येथील हॉटेल ब्लू वॉटर येथे दुपारी १२ वाजता झालेल्या या सभेला राज्यातील ४२ जिल्हा कुस्तीगीर संघांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्रातील कुस्तीच्या भविष्यासंदर्भात विविध महत्त्वपूर्ण विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

सभेतील ठरावानुसार वरिष्ठ गट गादी व माती राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा आणि ‘महाराष्ट्र केसरी’ किताबासाठीची २०२६-२७ची स्पर्धा आयोजित करण्याची जबाबदारी नागपूर शहर जिल्हा कुस्तीगीर संघ आणि नागपूर महानगरपालिका यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या कुस्तीविश्वाचे लक्ष आता नागपूरकडे लागले आहे. राज्यातील नामांकित मल्लांसह नवोदित कुस्तीपटूंनाही या स्पर्धेत आपले कौशल्य दाखविण्याची मोठी संधी मिळणार आहे.

याचबरोबर महिला कुस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धा वाशिम येथे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील महिला कुस्तीपटूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

सभेमध्ये शासनाच्या ‘मिशन लक्षवेध’ योजनेबाबतही सविस्तर चर्चा झाली. कुस्तीगीर संघाने मांडलेल्या प्रस्तावानुसार या योजनेमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी संघाचे पदाधिकारी मुख्यमंत्री आणि क्रीडामंत्र्यांची भेट घेणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कुस्तीपटूंना अधिक चांगल्या सुविधा, प्रशिक्षण, स्पर्धांच्या संधी आणि प्रोत्साहन मिळावे, यासाठी राज्यात कुस्तीच्या विकासाशी संबंधित विविध धोरणे राबविण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. आगामी काळात अधिकाधिक राज्यस्तरीय व इतर स्पर्धांचे आयोजन करून ग्रामीण तसेच शहरी भागातील कुस्तीपटूंना संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे.

# पुणे जिल्हा शिक्षण मंडळ अजितदादांच्या दूरदृष्टीचे प्रतीक

## सुनेत्रा पवार : बालगंधर्व रंगमंदिरात गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा गौरव

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळ ही स्व. अजितदादांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असून महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. संस्थेला अधिक गति व योग्य दिशा देताना अजितदादांनी जपलेली पारदर्शकता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये पुढे नेण्यासाठी आपण कटिबद्ध राहू, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री व संस्थेच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी केले.**




पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात संस्थेच्या वतीने आयोजित गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांच्या गौरव समारंभात त्या बोलत होत्या. या वेळी संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी, शिक्षक आणि प्राध्यापकांचा सन्मान करण्यात आला. तसेच पतसंस्थेच्या वतीने सेवानिवृत्त शिक्षक, गुणवंत सभासद पाल्य आणि सभासदांचाही गौरव करण्यात आला. याच कार्यक्रमात पतसंस्था, सेवक कल्याण आणि ग्राहक संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली.

सुनेत्रा पवार म्हणाल्या, शिक्षणाशिवाय व्यक्तीच्या मूल्यांचा आणि संस्कारांचा विकास पूर्ण होऊ शकत नाही. शिक्षण केवळ पदवी मिळविण्याची प्रक्रिया नसून ते व्यक्तिमत्त्वाला आकार देते. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक यशामागे त्यांची जिद्द, पालकांचा त्याग आणि शिक्षकांची दूरदृष्टी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक, पालक व शैक्षणिक संस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

कार्यक्रमात पुणे मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला, तर मानद सचिव ॲड. संदीप कदम यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला.

या प्रसंगी महिला प्रदेशाध्यक्ष वैशाली नागवडे, संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव, सेवक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सविता नाणेकर, उपाध्यक्ष डॉ. विलास वाणी, सचिव बंडू दातीर, खजिनदार चंद्रशेखर वाघमारे, सेवक कल्याण निधीचे अध्यक्ष डॉ. तुषार शितोळे, सचिव श्रीहरी लवांडे, ग्राहक संस्थेचे अध्यक्ष संतोष पठारे, सचिव अनिल जाचक उपस्थित होते.

## PMPML संचालक मंडळाच्या बैठकीत प्रवासी सुरक्षितता व कार्यक्षमतेवर भर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएमएल) संचालक मंडळाच्या बैठकीत प्रवासी सुरक्षितता, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची कार्यक्षमता, बस अपघातांतील नुकसानभरपाई, कर्मचाऱ्यांचे प्रश्न, निविदा व लेखापरीक्षणासह विविध प्रशासकीय व आर्थिक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना पीएमपीएमएलच्या बस पासमध्ये ५० टक्के सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बैठकीत घेण्यात आला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे आणि स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी बैठकीस उपस्थित राहून पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या सार्वजनिक वाहतुकीशी संबंधित विविध मुद्द्यांवर सूचना मांडल्या.**



### ३७ कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याचा निर्णय

यासोबतच महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने पात्र कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्यासंबंधी विषय तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांशी संबंधित प्रशासकीय विषयांचा विचार करण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर नियमांच्या चौकटीत सकारात्मक व कालबद्ध कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला. तसेच ३७ कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

बैठकीस पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे, स्थायी समिती सभापती श्रीनाथ भिमाले, संचालक शैलेश खेडेकर, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महेश आवाड यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य व संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना पीएमपीएमएलच्या बस पासमध्ये ५० टक्के सवलत लागू करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी मोठा आर्थिक दिलासा मिळणार असून सार्वजनिक वाहतुकीचा वापर त्यांच्यासाठी अधिक सुलभ व परवडणारा होणार आहे.

बैठकीत प्रवासी सुरक्षिततेच्या दृष्टीने पीएमपीएमएलच्या स्वमालकीच्या तसेच भाडेतत्त्वावरील बसेसमध्ये डॅशकॅम बसविण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. बसमधील तसेच मार्गावरील घटनांची वस्तुनिष्ठ नोंद उपलब्ध होण्यासह अपघात अथवा अन्य अनुचित घटनांच्या वेळी वस्तुस्थिती स्पष्ट होण्यासाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

पीएमपीएमएलच्या बस अपघातांमध्ये मृत्यू अथवा दुखापत झाल्यास संबंधितांना देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईबाबत निश्चित व सुस्पष्ट धोरण आखण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यानुसार बस अपघातात जखमी झालेल्या व्यक्तिस १ लाख रुपयांपर्यंत, तर दुर्दैवी मृत्यू झाल्यास संबंधित व्यक्तीच्या वारसांना ३ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच अपघातात मालमत्तेचे नुकसान झाल्यास शासकीय मूल्यमापनानुसार नुकसानभरपाईची रक्कम अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा प्रकरणांमध्ये कार्यवाही अधिक सुसूत्र, पारदर्शक व संवेदनशील पद्धतीने करून प्रवासीहिताचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला.

शहरांच्या वाढत्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नवीन बसेसची उपलब्धता, प्रवासी संख्येनुसार बसफेऱ्यांचे नियोजन, मेट्रो व अन्य सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला पूरक फीडर सेवा अधिक सक्षम करणे तसेच बसेसच्या ब्रेकडाऊनचे प्रमाण कमी करणे, या बाबींचाही आढावा घेण्यात आला. उपलब्ध बस ताफ्याचा जास्तीत जास्त कार्यक्षम वापर करून नागरिकांना वेळेवर, सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

DTE Code
6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**




Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507